# ५ - आरोग्य शिबीरे (आर.सी.एच.कॅम्प)

माता व बालकांना सर्वागीण आरोग्याच्या दृष्टीने लाभार्थीच्या गरजेनुसार आणि त्यांच्या सोयीच्या ठिकाणी दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी आरोग्य शिबीरे ही योजना सुरु करण्यात आली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्ह्यातील डोंगराळ, मागास आणि दुर्गम भागातील निवडक ५ ते ६ ठिकाणी दरवर्षी २ आरोग्य शिबीरे आयोजीत करण्येंत येतात.

## आरोग्य शिबीरातुन माहीती व सल्ला

१) कुटुंब नियोजनाच्या तात्पुरत्या आणि कायमस्वरुपी पध्दतीचा वापर
२) मासिक पाळी, वैद्यकीय गर्भपात सेवा, स्त्रीरोग विषयक तक्रारी, प्रजनन मार्गाचे आजार, गुप्तरोग.
३) पौंगडावस्थेतील आरोग्य विषयक तक्रारी यासंबधीची माहीती प्रदर्शने, स्लाईड शो, गटचर्चा, चित्रपट इ.व्दारे दिली जाते.

## आरोग्य शिबीरातुन दिल्या जाणा-या सेवा

१) स्त्रीरोग तज्ञ व बालरोग तज्ञाव्दारे तपासणी व औषधोपचार.
२) स्त्रीरोगविषयक तक्रारी, चाळीशीनंतरची तपासणी
३) ५ वर्षाखालील मुलांचे आजार व त्यावर उपचार, रक्तदाब, मधुमेह यासारख्या आजारांवर उपचार
४) वैद्यकीय गर्भपात, कुटुंब नियोजन पध्दती इ.बाबत सेवा.
५) अशा प्रकारची आरोग्य शिबीरे यशस्वी करण्यासाठी स्थानिक लोकर्प्रैतनिधी पदाधिकारी यांचा सहभाग घेण्यात येतो.
६) विशेष म्हणजे शिबीरांमध्ये विनामुल्य सेवा देण्यात येतात.